दैनिक आपल्या लोकांचा
# सत्यवादी
संपादक : शेख रेहान www.esatyawadi.com मो. 9822728340

## दादा, ७० हजार कोटींचा निकाल अजून बाकी-बावनकुळे



**मुंबई | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवडमध्ये भाजपवर टीका केली होती. ज्यांनी ७० हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला त्यांच्याचसोबत आपण सत्तेत आहोत, असं अजित पवार म्हणाले होते. तसेच त्यांनी भाजवर पिंपरी चिंचवडमध्ये भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप केला

*(पान २ वर...)*

# एसपींना जिल्हा सांभाळता येईना!



## कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली | भरदिवसा तरुणाचा खून



मयत हर्षद शिंदे



आरोपी विशाल सुर्यवंशी





### डीएसबी पथक आहे कुठे?

जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी गुन्हेगारांची अचूक माहिती गोळा करणे, तसेच राजकारण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे यासाठी डीएसबी पथक जिल्ह्यात कार्यरत असते. मात्र बीड जिल्ह्यामध्ये एवढ्या गुन्ह्याच्या घटना घडूनही याची माहिती डीएसबीला कशी मिळत नाही? हे आश्चर्यच आहे. दिवसाढवळ्या एखादा पिस्तुल आणि कोयता घेवून फिरतो मग नेमकी पोलीस यंत्रणा काय काम करते? हाच मोठा प्रश्न आहे.

**बीड | सत्यवादी**

मध्यंतरीच्या काळात बीड जिल्ह्याची परिस्थिती विकोपाली गेली होती, कायदा-सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली होती. कायदा-सुव्यवस्था सुधारण्यासाठी तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करुन त्यांच्या जागी तरुण, उमदे पोलीस अधीक्षक म्हणून नवनीत कॉवत यांची नियुक्ती करण्यात आली. सुरुवातीच्या काळात त्यांनी जिल्ह्यावर आपली छाप पाडली. अनेक अधिकाऱ्यांना सरळ केले, यंत्रणाही सुधारली मात्र हळूहळू पुन्हा यंत्रणेवरील त्यांची पकड ढिली झाली. अधिकारी त्यांना चुकीची माहिती देऊ लागले, त्यामुळे कायदा-सुव्यवस्था पुन्हा बिघडू लागली. बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरातील पत्रकाराच्या मुलाचा खून, जिल्ह्यातील दरोड्याच्या घटना, महिलांच्या छेडछाडीच्या घटना, अल्पवयीन मुलींना पळवून नेऊन त्यांच्यावर अत्याचार झाल्याच्या घटना आणि त्यानंतर आता ही दिवसाढवळ्या गोळीबाराची घडलेली घटना. यावरुन पोलीस अधीक्षकांना जिल्ह्याचा कारभार सांभाळता येईना की काय? असे प्रश्न विचारले जात आहे. जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचे दिसत आहे.

दिवसाढवळ्या गोळीबाराच्या घटना घडत असून, घटनास्थळी धारदार शस्त्रांचा वापर करून हल्ले केले जात असल्याचे प्रकार समोर येत

*(पान २ वर...)*



**फॉरेन्सिक प्रयोगशाळेचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून पुरावे संकलनासाठी तांत्रिक व सखोल तपासणी सुरू आहे.घटनेच्या तपासासाठी फॉरेन्सिक प्रयोगशाळेचे तज्ज्ञ घटनास्थळी दाखल झाले आहेत, आवश्यक पुरावे गोळा करण्यासाठी घटनास्थळाची सखोल व तांत्रिक तपासणी करण्यात येत आहे.**

### ...तर प्लंबरचा जीव वाचला असता

***गोळीबार प्रकरणातील आरोपी विशाल सूर्यवंशीवर अनेक प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल आहेत, मात्र उठसुठ एमपीडीए ॲक्टखाली हर्सुल जेलमध्ये टाकणाऱ्या पोलीस अधीक्षक यांनी अनेक प्रकरणामध्ये गुन्हेगार असलेल्या विशाल सूर्यवंशीवर एमपीडीए ॲक्टखाली कारवाई करुन त्याला हर्सुलमध्ये का टाकले नाही? तो आज हर्सुलमध्ये असता तर या प्लंबरचा जीव वाचला असता, केवळ दिखावा करण्यासाठीच पोलीस अधीक्षक कारवाया करतात असेच लोक बोलून दाखवत आहेत. अनेकांना गंभीर गुन्हे नसतांनाही एमपीडीएखाली कारवाई करुन हर्सुलमध्ये जेलमध्ये टाकण्यात आले, मात्र या अट्टल गुन्हेगाराला सुट कशी काय दिली? असा प्रश्न सर्वसामान्य लोक विचारत आहेत.***

## धर्मापुरी शिवारात सात चंदन चोर पकडले

### दोन लाख ६० हजाराचा चंदन साठा पोलिसांकडून जप्त

**परळी | सत्यवादी**

परळी तालुक्यातील धर्मापुरी ते पानगाव रस्त्याच्या डाव्या बाजूला गायरान जमिनीमध्ये काही लोक चंदनाची बेकायदेशीर खरेदी व विक्री आणि वाहतूक करत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांना मिळाल्यावरून या ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून सात जणांना ताब्यात घेतले. यावेळी पोलिसांनी दोन लाख ६० हजार रुपयांचे चंदनाचे लाकूड तसेच वाहने असा एकूण आठ लाख २१ हजार रुपयांचा माल जप्त केला. या प्रकरणी परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

*(पान २ वर...)*



## शिक्षकांच्या पगाराचा मार्ग मोकळा!

**नाशिक | सत्यवादी**

शिक्षकांच्या पगारपत्रकावर पुढील दोन दिवसांत सह्या करण्याचा निर्णय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी घेतला आहे. त्यामुळे शिक्षक शिक्षकेतरांच्या रखडलेल्या पगाराचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. पगारपत्रकावर सह्या न करण्याच्या अधिकाऱ्यांच्या निर्णयावरून संतप्त झालेल्या शिक्षक संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. याबाबत

*(पान २ वर...)*

## स्टंटबाजी करू नका!

### रोजगार हमीची कामे सुरळीत सुरू होणार-आ.धस



**आष्टी | सत्यवादी**

आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत मंजूर झालेली वैयक्तिक आणि सार्वजनिक कामे लवकरच सुरळीत होणार आहेत दि.३१ मार्च पर्यंतच महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमीची प्रलंबित कामे करावयाची असून अपूर्ण कामांना प्राधान्याने पूर्ण केल्यानंतरच नवीन कामांना सुरुवात करण्यात येणार आहे त्याचबरोबर ज्या लाभार्थ्यांनी कामे पूर्ण करून ही निधी अप्राप्त असेल त्या लाभार्थ्यांचे कामाची पाहणी करण्याचे संबंधित यंत्रणेला आदेश देण्यात आले असून या कामाची खात्री करून लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात येणार आहे दि.१एप्रिल

*(पान २ वर...)*

## बीड शहरातील समस्या मार्गी लावण्यासाठी भाजप आक्रमक



### गटनेत्या डॉ.सारिका क्षीरसागरांचे सीओंना निवेदन

**बीड | सत्यवादी**

नगरपरिषद निवडणुकीनंतर बीड शहरातील विविध प्रभागांमधील नागरिकांनी मूलभूत नागरी सुविधांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी व मागण्या केल्या आहेत. त्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशी मागणी नगरपरिषदेतील भाजपच्या गटनेत्या

*(पान २ वर...)*

## खा.ओवैसींनी भाजपाला घेरलं!



**लातुर | सत्यवादी**

राज्यात सध्या महानगर पालिकांच्या निवडणुकीमुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. सर्वच पक्षांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यामुळे अनेक नेते एकमेकांवर सडकून

*(पान २ वर...)*

## संसदेत आवाज सुप्रिया सुळे 'बिनविरोध' आवाज उठवणार

### निवडणूक आयोगाचे दुर्लक्ष चिंताजनक

**पुणे | सत्यवादी**

महानगरपालिका निवडणुकीत भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यासाठी लागलेली चढाओढ ही अघोरी असल्याची टीका होत असून, खासदार सुप्रिया सुळे यांनीही या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सध्या जे काही सुरू आहे ते माझ्यासह जनतेच्या मनाला

*(पान २ वर...)*



# पारवे ताई, फडसे साहेब, जन्म-मृत्यू विभाग दलालमुक्त करा!





## बीड नगर परिषदेतील दलालांना लोक वैतागले

**बीड | सत्यवादी**

बीड नगरपालिकेतील जन्ममृत्यू नोंदणी विभागात सध्या मोठ्या प्रमाणावर दलालांचा सुळसुळाट झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. शासनाने दिलेल्या नियमांनुसार जन्म व मृत्यूची नोंदणी ही मोफत अथवा अत्यल्प शुल्कात होणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात मात्र सामान्य नागरिकांची अडवणूक करून दलालांमार्फत अवाजवी रक्कम उकळली जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

जन्म दाखला, मृत्यू दाखला, दुरुस्ती नोंद, उशिरा नोंदणी यांसारख्या कामांसाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना थेट मदत न करता "बाहेरचे लोक" पकडण्यास भाग पाडले जाते. या दलालांमार्फत काम केल्याशिवाय फाईल पुढे सरकत नसल्याची भावना नागरिकांमध्ये असून, त्यामुळे गरीब व अशिक्षित नागरिकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. नागरिकांना नियमांची माहिती नसल्याचा गैरफायदा घेत दलालांकडून हजारो रुपयांची मागणी केली जाते. अनेक वेळा चुकीची माहिती देऊन किंवा खोटी आश्वासने देऊन नागरिकांची आर्थिक लूट केली जात असल्याचेही समोर येत आहे. यामुळे शासकीय यंत्रणेवरील विश्वास डळमळीत होत आहे.

*(पान २ वर...)*

दैनिक आपल्या लोकांचा
# सत्यवादी
07 जानेवारी बुधवार 2026


## संपादकीय

# संभ्रम की तारीख पे तारीख?

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची (कंबाईन ग्रुप बी संयुक्त पूर्व परीक्षा) तयारी करणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांनी दोन दिवसांपूर्वी ऐन परीक्षेच्या तोंडावर वय वाढीच्या मुद्द्यावर पुण्यातील शास्त्री रोड परिसरात आंदोलन केले; मात्र त्यांच्या या आंदोलनाला धूप न घातला ४ जानेवारी रोजीच्या परीक्षेच्या दिनांकात कुठलाही बदल न करता नियोजित वेळेत परीक्षा पार पडली. आधीच दोन वेळा परीक्षेच्या दिनांकात बदल केल्याने अनेक विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला होता की पुन्हा तारीख पे तारीख तर होणार नाही ना? परंतु परीक्षा नियोजित वेळेत पार पडली याचंही एक समाधान नक्कीच सर्व विद्यार्थ्यांमध्ये असेल.

नेमकं कशामुळे विद्यार्थ्यांना वारंवार आंदोलन करावं लागतं? सरकारची भूमिका काय असायला हवी आणि आयोगानंही वेळेच्या बाबतीत कितपत दक्ष राहावं? तसंच विद्यार्थ्यांनीही या परीक्षेबाबत काय विचार करायला हवा? यासारखे प्रश्न फारसे चर्चेला येतच नाहीत आणि म्हणून ते अनुत्तरित राहाता. त्यामुळेच विद्यार्थ्यांना वेळोवेळी आंदोलनाचा आसरा घ्यावा लागत आहे. इथे आपण राज्य सरकार, महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि विद्यार्थी या तिघांनी एमपीएससीच्या परीक्षेच्या संदर्भात काय भूमिका घ्यायला हवी, हाच प्रश्न महत्त्वाचा मानू.

दरवर्षी लाखोंच्या संख्यने विद्यार्थी आपले अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून एमपीएससी सारख्या परीक्षेची तयारी करीत असतात. स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी रात्रीचा दिवस करून अहोरात्र मेहनत घेत असताना मात्र पदांच्या नेमक्या संख्येबाबत तसेच वेळेच्या नियोजनाबद्दल सरकार मोठ्या प्रमाणात उदासीन असल्याचे दिसून येते. पदांचा तपशील एमपीएससीकडे सुपूर्द करण्यास लावलेला विलंब आणि तुटपुंज्या जागांची निर्मिती करून विद्यार्थ्यांच्या मानसिकतेशी खेळण्याची जोखीम महाराष्ट्र राज्य सरकार घेत असते. त्यामुळे सरकारने पहिल्यांदा दरवर्षी एका नियोजित तारखेत जागांचा ठरावीक तपशील एमपीएसीकडे देण्यासाठी स्वत: ला एका नियमाच्या चौकटीत बांधून घ्यावे जेणेकरून दरवेळी विद्यार्थ्यांना आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागणार नाही.

सरकारने पदांचा तपशील देण्यास विलंब केल्याने आयोगाकडून कधीच वेळेवर जाहिरात प्रकाशित केली जात नाही. कधी निकाल वेळेवर जाहीर केले जात नाहीत; तर कधी छोट्या मोठ्या समस्यांच्या सबबींवरून परीक्षांच्या दिनांकात सातत्याने बदल होत असतो. कोणत्याही प्रकारचे शिस्तबद्ध वेळापत्रक आयोगाच्या वतीने पाळले जात नाही परिणामी विद्यार्थ्यांच्या तयारी करण्यावर दूरगामी परिणाम होतो. साधा पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर करायचा म्हटले तरी बराच वेळ वाट पहावी लागते. परीक्षेच्या दिनांकापासून ते निकलापर्यंत आयोगाकडून वेळेचे नियोजन पाळले जात नाही त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे गेल्याच आठवड्यात नियुक्त झालेले अध्यक्ष विवेक भीमनवार तरी किमान यात लक्ष घालून हा प्रश्न निस्तरतील अशी अपेक्षा करूया.

पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कुणालाही परीक्षा देता येते. पण पदवीसाठीचे साधारण चार वर्षाचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एमपीएससीच्या परीक्षेची तयारी करण्यासाठी किती वर्षे द्यायला हवीत याचे एक नियोजन विद्यार्थ्यांनी करायलाच हवे. परीक्षा समजून घेण्यास एक वर्ष गेले असे आपण गृहीत धरूया, त्यानंतर कुठे अभ्यास कमी पडला किंवा इतर काही अडचणी मुळे निकाल एखाद–दोन गुणांनी राहून गेला असे गृहीत धरून आणखी फारतर चार वर्षे तुम्ही घ्यायला हरकत नाही– म्हणजे एकंदरीत, पदवी पूर्ण झाल्यानंतर चार ते पाच वर्षे जरी एखाद्या विद्यार्थ्याने या परीक्षा पूर्ण होण्यासाठी दिली तरी ते मान्य! तोपर्यंत संबंधित विद्यार्थ्यांचे सरासरी वय २८ इतके झालेले असणार आणि हीच वयोमर्यादा प्रत्येकाने स्वत:भोवती आखून घेतली पाहिजे. वयाच्या पस्तिशी– चाळिशीपर्यंत, केवळ 'वयोमर्यादेत बसता येते' म्हणून जर कुणी या परीक्षेची तयारीच करीत राहिले तर त्याला काहीएक अर्थ उरत नाही. कितीही वर्ष तयारी करायची आणि परत वय वाढवून द्या म्हणून आंदोलनासारख्या कुबड्याचा आधार घ्यायचा हे साफ चुकीचे असून विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

थोडा व्यापक विचार केला तर असे म्हणता येईल की, एमपीएससीच नाही तर भारतातील कोणत्याही परीक्षेची वयोमार्यदा ही २८ असली पाहिजे. मग त्यात कोणतीही जात, लिंग आड येता कामा नये. पुरुष असो वा स्त्री, अनुसूचित जाती/ जमातींचे उमेदवार असोत, ओबीसी असोत अथावा खुल्या प्रवर्गातले– प्रत्येकाला एकच निकष हवा तो म्हणजे या सेवेत शिरण्यासाठी अंतिम वयोमर्यादा तिशीच्या आधीची– म्हणजेच २८ वर्षे ही!

आपल्याकडे कोणत्याही सूचनेवर शंका घेतल्या जातात. तार्किक विचार न करता जातीय हितसंबंधांचे आरोप केले जातात, तसे करण्याचा मोह टाळून (किंवा अन्य कुणी अतार्किक विरोध करत असेल तर त्याकडे क्षणभरासाठी दुर्लक्ष करून) जरा विचार कार : ३० ३२– ३५– ४० वयापर्यंत परीक्षा देत बसणे म्हणजे आयुष्यातली उमेदीची वर्षे वाया घालवण्यासारखे आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनीही याबाबत गांभीर्याने विचार करायला हवा.

# ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी सरकारचे सहकार्य



**मुंबई । सत्यवादी**

राज्यातील ग्रंथालय चळवळीला अधिक सक्षम करण्यासाठी नव्याने गठीत करण्यात आलेल्या ग्रंथालय परिषदेची बैठक तब्बल १६ वर्षांनी मंगळवारी मंत्रालयात पार पडली. या बैठकीत ग्रंथालय व्यवस्थापनाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस निर्णय घेण्यात येतील, ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी सहाकर्य केले जाईल, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.

राज्य सरकारच्या निर्णयानुसार सुमारे १६ ते १७ वर्षांनंतर राज्य ग्रंथालय परिषद पुन्हा गठीत करण्यात आली. नव्याने गठीत परिषदेची पहिली बैठक आज मंत्रालयात संपन्न झाली. या परिषदेची मागील बैठक २६ मे २००९ रोजी पार पडली होती. त्यानंतर १६ वर्षांनी ही बैठक घेण्यात आली. आता परिषदेच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळ सक्षम करण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ देण्यात येणार आहे तसेच ग्रंथालय व्यवस्थापनाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस निर्णय घेण्यात येतील, असे चंद्राकांत पाटील यांनी यावेळी सांगितले. बैठकीत ग्रंथालय संचालनालयाचे सन २००८–०९ ते २०२४–२५ या कालावधीतील वार्षिक अहवाल मंजुरीसाठी चर्चेला घेण्यात आले. चर्चेदरम्यान ग्रामीण भागात वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी सीएसआर निधी किंवा राजाराम मोहनरॉय योजना यांच्या माध्यमातून मोबाईल वाचन व्हॅन खरेदी करून ती गावे, शाळा आणि दुर्गम भागांमध्ये नेऊन वाचन उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. गाव तिथे ग्रंथालय उपक्रम राबविण्यासाठी ग्रामविकास विभागाशी चर्चा करण्यात येईल, असे पाटील यांनी बैठकीत स्पष्ट केले. संचनालयातंर्गत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय आणि सहा विभागीय ग्रंथालयांमध्ये फिरते ग्रंथालय सेवा देणे ही योजना प्रायोगिक तत्त्वावर निर्माण करण्याचा मानस आहे. ई–लायब्ररी, फिरते वाचनालय आदी विषयांवर चर्चा करण्यात आल्याचे पाटील यांनी सांगितले. या बैठकीला उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अमोल मुत्याल, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार, ग्रंथालय संघ अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे, ग्रंथालय संघ मराठवाडा विभागाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, पुणे विभागाचे अध्यक्ष सोपान पवार, कोकण विभागाचे अध्यक्ष दिलीप कोरे,डॉ सिद्धी जगदाळे, डॉ सुभाष चव्हाण, सुनील वायाळ आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पान १ व ४ वरुन...

## एसपींना जिल्हा सांभाळता येईना!

आहेत. ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे.एकीकडे पोलीस प्रशासनाकडून मागील एका वर्षात गुन्हेगारी घटनांमध्ये घट झाल्याचा अहवाल सादर करण्यात आला होता, मात्र दुसरीकडे खूनाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती नेमकी कोणत्या पातळीवर आहे?असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

बीड शहरातील अंकुश नगर परिसरात आज दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास एका तरुणाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे गेल्या काही दिवसांपासून शांत असलेल्या बीड शहरात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.मृत तरुणाचे नाव हर्षद तुळशीदास (तुषार) शिंदे (वय अंदाजे ३० ते ३५) असून तो धानोरा रोड येथील हाउसिंग कॉलनीचा रहिवासी होता. हर्षद शिंदे हा बीड नगर परिषदेत प्लंबर म्हणून काम करत असल्याची माहिती आहे. तर त्याच्यावर गोळीबार करणारा आणि कोयत्याने मारणारा आरोपी विशाल संजय सूर्यवंशी (वय ३०, रा.अंकुशनगर, धानोरा रोड, बीड) हा आझाद समाज पार्टीचा जिल्हा प्रभारी आहे.

प्राथमिक माहितीनुसार, अज्ञात व्यक्तीने त्याच्यावर दोन वेळा गोळीबार केला. गंभीर जखमी अवस्थेत तो खाली कोसळल्यानंतरही हल्लेखोराने धारदार शस्त्राने तोंडावर वार केल्याचे सांगितले जात आहे. या हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) पूजा पवार आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.दरम्यान, खून कोणी व कोणत्या कारणामुळे केला, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. पोलिसांकडून घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. घटनेनंतर परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमली होती.या घटनेमुळे बीड शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे चित्र दिसून येत आहे. सुरुवातीच्या काळात पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची दहशत होती, त्यांनी अनेक गुन्हेगारांना तडीपार केले. मात्र हळूहळू ही दहशत संपत असून गोळीबार करणाऱ्या तरुणावर गेल्या काही दिवसात अनेक गुन्हे दाखल असतांनाही तो दिवसाढवळ्या पिस्तुल आणि कोयत्यासारखे घातक शस्त्रे घेऊन राजरोस फिरत असतांनाही पोलीसांना याची माहिती कशी काय मिळाली नाही? की जाणीवपूर्वक ही माहिती पोलीस यंत्रणेने दडवली? असाही संशय निर्माण होत आहे. पोलीस अधीक्षकांना चूकीची माहिती पुरवून आपली तुंबडी भरण्याचे काम काही पोलीस अधिकारी करत असल्याचे मागील काही घटनांवरुन स्पष्ट होत आहे. पोलीस अधीक्षकांनी या बाबीचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

## दादा, ७० हजार कोटींचा

होता. त्यांच्या आरोपांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात नुकतंच प्रत्युत्तर दिल्याचं बघायला मिळालं. त्यानंतर आता भाजपचे नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी बावनकुळे यांनी अजित पवार यांना मोठा इशारा दिला आहे.

''अजित दादांना मी काही सूचना देईन किंवा सांगेल एवढा मोठा मी नाही. पण आमच्या महायुतीच्या समन्वय समितीत, ज्या समितीत मी स्वत: आहे, त्या समितीचं ठरलं होतं की, मित्रपक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढत लढताना कोणत्याही प्रकारची वैयक्तिक टीका होणार नाही याची काळजी घ्यावी. आम्ही समन्वय समितीने सूचित केल्यानुसार काळजी घेतली. पण अजित दादांनी ती काळजी घेतली नाही'', असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## जि.प. शिक्षण विभागात

**नेमका प्रकार काय?**

नियमतः पदवीधर शिक्षक हे वरिष्ठ श्रेणीत येतात. मात्र, सोयीच्या शाळा मिळवण्यासाठी किंवा शहराच्या जवळच्या ठिकाणी नियुक्ती मिळवण्यासाठी अनेक पदवीधर शिक्षक स्वतःहून डिमोशन घेत आहेत. पदवीधर पदाचा त्याग करून सहशिक्षक पदावर रुजू होताना रिक्त असलेल्या जागांचा वापर केला जात आहे. विशेषतः ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे किंवा ज्या शाळा सोयीच्या ठिकाणी आहेत, अशा जागांवर या शिक्षकांचा डोळा आहे.

**जागांचे मॅनिपुलेशन**

रिक्त जागांचा अहवाल बदलून किंवा सोयीनुसार जागा रिक्त दाखवून हा खेळ खेळला जात असल्याचा आरोप आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष: इतक्या मोठ्या प्रमाणावर डिमोशनची प्रक्रिया पार पडत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष का केले, असा सवाल उपस्थित होत आहे.

**नियमांची पायमल्ली**

प्रशासकीय निकष डावलून केवळ वैयक्तिक फायद्यासाठी पदावनती दिली जात आहे.

## साहेबांचं नेतृत्व मान्य

कार्यकर्ता नाही. महाराष्ट्रात आपलं पुणे आणि पिंपरी चिंचवड क्रमांक एकवर राहिलं पाहिजे एवढंच माझं म्हणणं आहे. आज अनेक प्रश्न या ठिकाणी निर्माण झाले आहेत ते सोडवायचे आहेत. अनेक युवा मतदार आहेत, त्यांना योग्य दिशेने न्यायचं आहे. मी फक्त प्रचाराला येऊन मतं मागायला आलेलो नाही. मी सकाळी ६ वाजता उठून काम करणारा आणि लोकांचे प्रश्न समजून घेत त्यातून मार्ग काढणारा माणूस आहे असं अजित पवार पिंपरीतल्या सभेत म्हणाले.

**झालं गेलं गंगेला मिळालं– अजित पवार**

''आम्ही यावेळेस तुतारी आणि घड्याळाला बरोबर घेतलं आहे. आम्हाला वाद घालायचा नाही. मागचं झालं गेलं गंगेला मिळालं, आता आपण एकोप्याने काम करायचं आहे. साहेबांचं नेतृत्व म्हणजे पुढची दृष्टी असणारं नेतृत्व आहे.'' असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. केंद्राचं आणि राज्याचं राजकारण महापालिकेत आणायचं नाही. तिथलं राजकारण तिथं ते इथं आणायचं नाही असंही अजित पवार म्हणाले.

## नाळवंडीच्या उर्वरित रस्त्याचा प्रश्न

कामासाठी व नळकांडी पुलासाठी ६३ लाख रुपयाचा निधी जिल्हा वार्षिक विकास योजनेअंतर्गत दिलेला आहे. या रस्ता कामाचे उद्घाटन मंगळवार दिनांक ६ जानेवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, नगरसेवक दत्ता जाधव, अरिफ खान, नगरसेवक शेख निजामभाई, आनंद पवार, भाऊसाहेब डावकर, इनामदार खय्युम, ईश्वर पवार, बाबूलाल पवार, संतोष जाधव, विलास घनवट, अनिल देवकर, संजय इटकर, अनिल पवार यांच्यासह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी नाळवंडी रोडवरील खडी क्रेशर चालक संघटनेच्यावतीने बीड नगरपालिकेत आ. विजयसिंह पंडित यांना मोठ्या प्रमाणात यश आल्याबद्दल त्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी खडी क्रेशर चालख हरिभाऊ क्षिरसागर, राजाभाऊ कानडे, सतीश चिपाडे, बाळासाहेब कानडे, आनंद पवार, अमोल गायकवाड, प्रेमराज गुंजाळ यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## स्टंटबाजी करू नका!

२०२६ पासून विकसितभारत– जी राम जी योजनेअंतर्गत कामांना सुरुवात होणार आहे.. आष्टी पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील सर्व प्रलंबित कामे सुरू होऊन मजुरांना रोजगार उपलब्ध होणार आहेच आम्ही लाभार्थी शेतकरी आणि मजुरांच्या रोजगाराची संपूर्ण व्यवस्था केली असल्यामुळे विरोधकांनी आंदोलन करण्याची भाषा करून स्टंटबाजी करू नये असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, मध्यंतरी आष्टी पाटोदा आणि शिरूर पंचायत समिती आणि तहसील कार्यालयामध्ये रोजगार हमी योजने विषयक आढावा बैठका घेऊन संपूर्ण योजनेविषयी ची माहिती घेतली आहे जुनी भरमसाठ कामे मंजूर आहेत त्यातील अनेक नियम बाह्य आहेत ही नियमबाह्य कामे रद्द करून नियमानुसार लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणे आवश्यक असल्यामुळे नियमानुसार असलेली अपूर्ण कामे अगोदर प्राधान्याने पूर्ण करावे याची असून सर्व कामांना सुरुवात करण्यात येणार आहे प्राधान्याने ज्या कामांचे एक मास्टर भरले आहे ते अगोदर सुरुवात करून त्यानंतर ज्याचे दोन–तीन मस्टर भरले आहेत ती कामे पूर्ण करण्यात येणार आहेत ही कामे पूर्ण झाल्यानंतरच नवीन कामांना सुरुवात करण्यात येणार आहे संबंधित यंत्रणेतील रोजगार सेवक पीटीओ तांत्रिक अधिकारी या कर्मचाऱ्यांनी कोणत्याही लाभार्थ्याला आर्थिक त्रास देण्याचा प्रयत्न केल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही त्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्यात येईल असा इशारा देऊन लाभार्थ्यांनी अशी मागणी झाल्यास तात्काळ माहिती द्यावी असेही ते म्हणाल

रोजगार हमी योजनेतील महत्त्वाचा घटक असलेला रोजगार सेवक हा सरपंचापेक्षा मोठा समजायला लागलेला असून द्वितीय रोजगार सेवकाचे आयडी पासवर्ड मस्टर हजेरी येथील विसंगती दिसून आली आहे त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर काम मागणी अर्ज ऑनलाईन मस्टर वेज लिस्ट आणि ऍक्टिव्ह प्रक्रिया सुसूत्रपणे राबवण्याचे स्पष्टपणे सांगण्यात आले असून अनुसूचित जाती जमाती बचत गट आणि विधवा महिलांसाठी शेळी पालन शेड उभारणी ही कामे देखील प्राधान्याने करण्यात येणार आहेत नव्याने विरोधक निर्माण झालेले मजूरांच्या रोजगारासाठी आंदोलनाची भाषा करत आहेत ही स्टंटबाजी करण्याची आवश्यकता राहिलेली नसून सर्व कामे सुरळीत लवकरच होणार आहेत हे माहिती झाल्यामुळेच आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे असे असेही त्यांनी शेवटी म्हटले

## धर्मापुरी शिवारात सात

अंबाजोगाईचे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांना ५ जानेवारी रोजी सायंकाळी सात वाजता गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. यावरून धर्मापुरी ते पानगाव रस्त्यावर पोलिसांनी रात्री नऊ वाजता छापा टाकला. यावेळी विनापरवाना चंदनाची तस्करी करताना सात जण सापडले. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यात पप्पू बाबुराव सूर्यवंशी, राहुल पप्पू सूर्यवंशी, तेजस कलाप्पा काळिंबे, नितीन सटवा जाधव, अविनाश व्यंकट जाधव, व्यंकट रामचंद्र जाधव व भारत निवृत्ती गायकवाड यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यावेळी १०४ किलो चंदनाचे लाकूड ज्याची किंमत दोन लाख ६० हजार रुपये ,३९ किलो चंदनाची साल ज्याची किंमत ३९ हजार रुपये, टाटा इंडिको कार ज्याची किंमत तीन लाख रुपये, चार दुचाकी वाहने ज्यांची किंमत एक लाख ६० हजार रुपये, एक विना नंबर दुचाकी ज्याची किंमत वीस हजार रुपये, सात मोबाईल फोन ज्याची अंदाजे किंमत ६१ हजार रुपये, लोखंडी तराजू व वाकस ज्याची किंमत एक हजार रुपये असा एकूण आठ लाख २१ हजार रुपयांचा माल पंचा समक्ष जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिस अमंलदार सतीश कांगणे यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ३०३ (२), ३१७( २ ),३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक असद शेख, पोलीस उपनिरीक्षक निमोणे,पोह. बासर, बिक्कड उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील सतीश कांगणे, सहाय्यक फौजदार सोडगीर, पोलिस अंमलदार उत्तरेश्वर केदार, खंदारे यांनी केली.

## आष्टी तालुका पत्रकार

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित पत्रकार बांधवांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. ही निवड प्रक्रिया ज्येष्ठ पत्रकार प्रफुल सहस्त्रबुद्धे, उत्तमराव बोडखे, दत्ता काकडे, सिताराम पोकळे तसेच मावळते अध्यक्ष प्रवीण पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी संघाच्या वाटचालीचा आढावा घेत पुढील दिशा व धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शरद तळेकर, रघुनाथ कर्डिले, गणेश दळवी, सचिन रानडे यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे आष्टी तालुका पत्रकार संघ अधिक सक्षम होऊन पत्रकारांच्या हितासाठी भक्कमपणे कार्य करेल, अशी भावना उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केली.

## शिक्षकांच्या पगाराचा मार्ग

सरकारमार्फत अधिकाऱ्यांच्या संघटनेला बैठकीचे आश्वासन देण्यात आल्यामुळे येत्या दोन दिवसांत अधिकाऱ्यांकडून पगारपत्रकांवर सह्या केल्या जाणार आहेत.

## गुत्तेदार आणि प्रशासनाचा

किमान त्यांनी तरी तात्काळ अर्धवट काम पूर्ण करून धुळीपासून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे. नसता जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या पर्यंत पत्रकारांमार्फत हा विषय जाणार असल्याचे समजते. बालेपीर मस्जिद आणि महामार्ग यांचा रस्त्याच्या हद्दीवरुन वाद असल्याचे समजते, तसेच वादाचा त्रास नागरिकांना कशासाठी? आणि मस्जिदच्या हद्दी वादाच्या आहेत त्या वगळून बाकीचा रस्ता पूर्ण करायला काय हरकत आहे? असही लोकांचा प्रश्न आहे. महामार्गाच्या अर्ध्या भागात हद्द एकपदरी शिल्लक आहे वाद मिटेपर्यंत किमान तो थोडासा टुकडाही एकपदरी डांबरीकरण करणे शक्य आहे. उर्वरीत विनाकारण सोडलेला रस्ता तात्काळ काँक्रीट करून घेण्याची मागणी होत आहे.

## बीड शहरातील समस्या

डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे मंगळवारी (दि.६) निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी भाजपच्या नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

**मुख्याधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद**

भाजपच्या शिष्टमंडळाने केलेल्या मागण्या पूर्ण करण्यात येतील. आवश्यक ती कार्यवाही करुन नागरिकांना अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न नगरपरिषद प्रशासनाचा राहील, असा सकारात्मक प्रतिसाद मुख्याधिकाऱ्यांनी दिला आहे. यावेळी नगरसेवकांनी प्रभागातील समस्या मांडल्या.

## पारवे ताई, फडसे साहेब,

या प्रकाराकडे नगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, जन्ममृत्यू विभागात दलालांना अभय देणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करून कठोर कारवाई करावी, दोषींवर निलंबन व गुन्हे दाखल करावेत, तसेच संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक करावी, अशी स्पष्ट मागणी होत आहे.

नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रेमलता ताई पारवे व मुख्याधिकारी फडसे साहेबांनी या कडे जातीने लक्ष देऊन जन्म मृत्यू विभाग तात्काळ दलालमुक्त करून स्पष्ट सूचना फलक, वेळबद्ध सेवा, तसेच तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## खा.ओवैसींनी भाजपाला घेरलं!

टीका करताना पहायला मिळत आहेत. सत्ताधारी नेते विकासावर मत मागत आहेत, तर विरोधी पक्षांतील लोक सत्ताधाऱ्यांच्या कारभारांवर आरोप करताना पहायला मिळत आहेत. अशातच आज लातूरमध्ये पक्षाच्या वतीने प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत बोलताना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असदुद्दीन ओवैसींनी भाजपर सडकून टीका केली आहे. असदुद्दीन ओवैसींनी सभेनंतर पत्रकाराशी बोलताना म्हटले की, भाजपाच्या लोकांना मी विचारतो की, तुम्ही डोनाल्ड ट्रंप यांना का घाबरता? ट्रम्प यांचे नाव घेतले की तुम्ही थंड होवून जाता. ट्रम्प विमानात उभे राहून सांगतात की, मोदी चांगले व्यक्ती आहेत मात्र ते मला खुश करण्यासाठी काही गोष्टी करतात. त्यांनी असे विधान करून २४ तास उलटून गेले, मात्र भाजपच्या कुणीही पुढे येऊन उत्तर दिलेले नाही. पंतप्रधान हा संपूर्ण देशाचा पंतप्रधान असतो, तो कोण्या एका समाजाचा नसतो त्यांची प्रतिष्ठा ही देशाची प्रतिष्ठा आहे. तुम्ही कधी बोलणार? असा सवाल खासदार ओवैसी यांनी उपस्थित केला आहे.

## मराठी पत्रकार परिषदेच्या

विचाराची देवाण–घेवाण झाली. या कार्यक्रमाला मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगरचे सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, संपादक संजय मालानी, संपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे प्रसिद्धी प्रमुख संजय हांगे, संपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे हल्लाविरोधी कृती समितीचे समन्वयक अभिमन्यू धरत,तालुका समन्वयक मंगेश निटुरकर, अनिल अष्टपुत्रे, दिलीप शिंगाडे आदींची उपस्थिती होती.

## जातीय द्वेषातून रा.प.

केला, अशी तक्रार त्यांनी केली. सहाय्यक वाहतूक अधिक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन आणि प्रतिक्षा यादीत नाव असतानाही जातीय आकसातून बढतीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न वरीष्ठ अधिकारी निलेश पवार करीत आहेत.

यानंतर निलेश पवार यांची बदली विभागीय कार्यशाळेत ओ.एम.ई. म्हणून झाली. मात्र तेथे असतानाही त्यांना कर्मचारी वर्ग अधिकारी (डीपीओ) पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आणि त्या अधिकाराचा गैरवापर करून बनसोडे यांची बीड आगारातून धारूर आगारात नियमबाह्य बदली करण्यात आली, होती. तेव्हापासून सतत मानसिक व प्रशासकीय त्रास देण्याचे प्रकार सुरू असल्याचे माहिती मिळते.

## बीडमध्ये महिला उद्योजकतेचा

फूड, मशरूम आणि घरगुती खाद्यपदार्थांचा समावेश होता.

**कर्तृत्ववानांचा यथोचित सन्मान म्हणून**

याच कार्यक्रमाचे औचित्य साधून सामाजिक भान जपणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. प्रदर्शनादरम्यान नवनिर्वाचित नगरसेवक, पत्रकार आणि विविध सामाजिक कार्यकर्त्यांचा सोनल अरविंदसिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समाजाच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या या घटकांना सन्मानित करून तेजस्विनी ग्रुपने एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

**उद्योजिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले.**

दिवसभर चाललेल्या या प्रदर्शनात स्टॉलधारकांची मोठी विक्री झाली. अनेक महिला उद्योजिकांनी एकाच दिवसात हजारो रुपयांची विक्री केल्याने प्रदर्शनात लाखोंची उलाढाल झाली. ''तेजस्विनी ग्रुपमुळे आम्हाला हक्काची बाजारपेठ मिळाली,'' अशा शब्दांत पुणे आणि अकोल्याहून आलेल्या स्टॉलधारकांनी आपला आनंद व्यक्त केला. सर्वच स्टॉलधारक या प्रतिसादाने अतिशय खुश दिसून आले. ''महिलांनी आत्मनिर्भर व्हावे हीच आमची जिद्द आहे. संक्रांतीच्या निमित्ताने महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देता आले आणि समाजातील विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा सन्मान करता आला, याचे समाधान मोठे आहे. अशी प्रतिक्रिया '' सोनल अरविंदसिंह पाटील (संचालिका, तेजस्विनी ग्रुप) यांनी दिली.

## संसदेत आवाज सुप्रिया सुळे

अस्वस्थ करणारे असल्याचे सांगत, मतदारांकडे नोटाचा पर्याय उपलब्ध असतानाही अशा पद्धतीने त्यांचा मतदानाचा मूलभूत अधिकार हिरावून घेतला जात असल्याचा गंभीर आरोप सुळे यांनी यावेळी केला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, तब्बल ७ ते ८ वर्षांनंतर निवडणुका होत आहेत. तरीसुद्धा मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडणुका होत आहेत. नोटाचा पर्याय उपलब्ध असूनही मतदारांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जात आहे. यामध्ये धमकीचे प्रकार, बंदुकीच्या जोरावर दहशत, पैशांचा अतोनात वापर, उमेदवारी अर्ज माघारीसाठी विविध प्रकारचा दबाव, ब्लॅकमेलिंग, बोगस मतदान आणि मतदारांना दिली जाणारी प्रलोभने असे अनेक गंभीर प्रकार माध्यमांतून सातत्याने समोर येत असल्याचे सुळे म्हणाल्या. हे सर्व घडत असताना निवडणूक आयोगाचे दुर्लक्ष अधिकच चिंताजनक आहे. सुदृढ लोकशाहीसाठी हे अतिशय धोकादायक आहे. मी याबाबत यापूर्वीही संसदेत आवाज उठवला आहे, आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी पुढेही हे मुद्दे सातत्याने मांडत राहावे लागणार आहेत असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या. राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गटात उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याची जणू चढाओढच लागली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, राज्यातील ६९ पैकी तब्बल ६८ जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले असून, या ऐतिहासिक पण वादग्रस्त घटनेमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. निवडणूक व्यवस्थाच संकटात सापडली असून लोकशाही प्रक्रियेऐवजी केवळ पैशाची ताकद आणि राजकीय दबावाच्या जोरावरच आता निकालांचे चित्र स्पष्ट होत असल्याचे गंभीर चित्र सध्या महाराष्ट्रामध्ये पाहायला मिळत आहे.

# जांभेकरांनी घालुन दिलेला पत्रकारितेचा आदर्श पत्रकारांनी जपावा-राजेश साबणे

## परळी शाखेच्या वतीने दर्पण दिन उत्साहात साजरा




**परळी । सत्यवादी**

आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी घालुन दिलेला पत्रकारितेचा आदर्श पत्रकार बांधवांनी जपावा, लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि समाजसुधारणा घडवून आणणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या परळी शाखेचे सल्लागार तथा दैनिक परळी प्रहारचे संपादक राजेश साबणे यांनी केले.

मंगळवार, दि. ०६ जानेवारी २०२६ रोजी दैनिक मराठवाडा साथी सभागृहात विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तसेच विभागीय संघटक सुभाष चौरे, विभागीय सचिव रवी उबाळे, बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे, गजानन मुडेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ११ वाजता आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व अभिवादन करून दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी श्री राजेश साबणे बोलत होते. या कार्यक्रमास तालुका अध्यक्ष धीरज जंगले, शहराध्यक्ष किरण धोंड, तालुका उपाध्यक्ष अनिल गायकवाड, तालुका कोषाध्यक्ष संदीप मस्के, शहर सचिव माणिक कोकाटे, प्रसिद्धी प्रमुख कैलास डुमणे निवृत्ती खटींग जोशी आदी उपस्थित होते.

श्री राजेश साबणे पुढे बोलताना म्हणाले, बाळशास्त्री जांभेकर हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अग्रगण्य समाजसुधारक आणि पत्रकार होते. त्यांना 'मराठी वृत्तपत्रांचे जनक' म्हणून ओळखले जाते. दर्पण: ६ जानेवारी १८३२ रोजी त्यांनी मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले. लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि समाजसुधारणा घडवून आणणे हा त्यामागील मुख्य उद्देश होता. ६ जानेवारी हा 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो. यावेळी किरण धोंड, धिरज जंगले, संदीप मस्के यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनिल गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन निवृत्ती खटींग यांनी केले.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी ग्रामविकास करावा-डॉ.धोंडे

**आष्टी । सत्यवादी**

आष्टी येथील भगवान महाविद्यालय व पंडित जवाहरलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबिराचे उद्घाटन मोठ्या उत्साहात रुई नालकोल येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अजय दादा भीमरावजी धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच पार पडले. उद्घाटक म्हणून श्रीमती संध्या श्रीपती नालकोल, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक, बीड श्री. रवी सात भाई सर, सरपंच विष्णू मांढरे, श्री पांडुरंग धोंडे ( सेवा सोसायटी चेअरमन ), श्री नामदेव धोंडे ( कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती), भगवान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, पंडित जवाहरलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री सुरेश बोडखे हे उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम प्रसंगी बोलताना श्री राम बोडखे म्हणाले की'' राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले जाते.

या कार्यक्रमाच्या वेळी भगवान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ म्हणाले की '' राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील आरोग्य, ग्राम स्वच्छता, जलसंधारण, अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य इत्यादी ची माहिती मिळते. विद्यार्थ्यांना शेतीविषयक खते,बी बियाणे, औषध फवारणी इत्यादीचे ज्ञान मिळते.या कार्यक्रमाच्या वेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अजय दादा धोंडे म्हणाले की '' राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व पटवून शिस्तीचे पालन करण्याची सवय लागते. राष्ट्रीय सेवा योजने च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी सदाचार, नैतिकता, नियमांचे पालन, शिस्त इत्यादी गुणांचा विकास होत असतो म्हणून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी होऊन ग्राम स्वच्छता करावी.

या कार्यक्रमाच्या वेळी श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य श्री संजय धोंडे, संजय नालकोल, श्रीपती नालकोल ( सरपंच पती ), श्री सागर करडूळे ( कृषी सहाय्यक अधिकारी ), श्री पालवे साहेब ( ग्रामविकास अधिकारी ), श्री अजिनाथ नालकोल, डी एड. महाविद्यालयाचे प्राचार्य. निशिगंध सर, भगवान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, पंडित जवाहरलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य श्री सुरेश बोडखे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. देवकर सर, उपप्राचार्य श्री ज्ञानदेव वैद्य, श्री आप्पासाहेब टाळके, प्रा. श्रीकांत धोंडे, प्रा. अच्युत गायकवाड, प्रा. चांगदेव सानप, प्रा. सुरेश फुले, प्रा. सुनील भोज, प्रा. हरीश चाऊस, प्रा. योगेश देशपांडे, प्रा. किशोर धोंडे, प्रा. बाळासाहेब गावडे, प्रा. आबासाहेब पोकळे, प्रा. अनिल हजारे, प्रा. दिलीप जरे, प्रा. तोरडमल सर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. श्रीकांत धोंडे यांनी केले तर आभार पंडित जवाहलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य श्री सुनील भवर यांनी केले या कार्यक्रमाच्या वेळी सर्व राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दर्पण दिनानिमित्त ५४ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**आष्टी । सत्यवादी**

पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीदिनी (६ जानेवारी) दर्पण दिन साजरा करण्याच्या परंपरेअंतर्गत आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने यावर्षी एक सामाजिक उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. गणपती लिमटाका मंदिर, आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५४ जणांनी रक्तदान करून समाजासाठी उदात्त बांधिलकीचे दर्शन घडवले. हा उपक्रम राबवून संघाने दर्पण दिन उत्साहात साजरा केला. आष्टी तालुका युवा पत्रकार संघ नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवत असून, ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्वान महिलांचा झुंजार नारी पुरस्कार देऊन समाजातील प्रेरणादायी महिलांचा सन्मान करतो. त्याचप्रमाणे, दर्पण दिनानिमित्त गेल्या तीन वर्षांपासून समाजासाठी व पत्रकारितेसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान केला जातो. या वर्षी, सामाजिक जागृतीला अधिक चालना देण्याच्या हेतूने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

## बालनंदनवन दर्पण दिन साजरा

**शिरूरकासार । सत्यवादी**

वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'दर्पण दिन' बालनंदनवन इंग्लिश स्कूलमध्ये काल मंगळवार ६ जानेवार रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

मराठी पत्रकार परिषद, शिरूर कासार यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

# क्रोएशियात होणाऱ्या वर्ल्ड रँकिंग कुस्ती स्पर्धेसाठी आतिश तोडकरची निवड



**आष्टी । सत्यवादी**

तालुक्यातील मंगरूळ चा सुपुत्र पैलवान आशिष तोडकर याची क्रोएशिया येथे होणाऱ्या वर्ल्ड रँकिंग कुस्ती स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याकडून निवड करण्यात आली आहे.

दिल्ली येथे झालेल्या रँकिंग कुस्ती स्पर्धेत माझ्या मतदारसंघातील मंगरूळ गावाचा सुपुत्र, पैलवान अतिश सुनिल तोडकर यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या उत्कृष्ट प्रदर्शनाच्या जोरावर ४ फेब्रुवारी रोजी क्रोएशिया येथे होणाऱ्या वर्ल्ड रँकिंग कुस्ती स्पर्धेसाठी त्यांची महाराष्ट्राकडून निवड झाली आहे.

तसेच १५ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या प्रो रेसलिंग लीगसाठीही त्यांची महाराष्ट्र केसरी संघात निवड झाली आहे. ही बाब मंगरूळ गावासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे.

अतिश तोडकर यांच्या या यशाबद्दल त्यांचे आमदार सुरेश आण्णा धस , गणेश शिंदे ,अमोल राजे शिंदे ,बबन दादा शिंदे यांच्यासह सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून त्याच्यावर कौतुकाचा वर्षा होत आहे.

# जिल्ह्यातील रिपाइं नगरसेवकांचा सत्कार



**बीड । सत्यवादी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाइं) बीड मध्यवर्ती कार्यालयात रिपाइं नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत जनतेचा विश्वास संपादन करून यश मिळवलेल्या लक्ष्मण सिरसट(धारूर), कार्तिक कांबळे (परळी), भारत कांबळे व शीतल चक्रे (बीड), रितू सुजित वैरागे (धारूर) या नगरसेवकांचा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते पुष्पहार, शाल व फेटा बांधून त्यांचा सत्कार करण्यात आला.

## रिपाइं नगरसेवकांचे हे यश कार्यकर्त्यांच्या कष्टाचे फलित-पप्पू कागदे

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पप्पू कागदे म्हणाले की, रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील पाच नगरसेवक निवडून आलेले आहेत. रिपाइंच्या नगरसेवकांनी मतदारांनी टाकलेल्या विश्वासाला तडा न जावू देता, प्रामाणिकपणे काम करणे हीच खरी जबाबदारी आहे. बीड जिल्ह्यात रिपाइंची मजबूत बांधणी असल्यामुळे व पक्षाची ताकद असून कार्यकर्ते यांच्या एकजुटीमुळे हे यश शक्य झाले आहे.

# ॲड.शेख जावेद मनियार यांना सावित्रीबाई फुले लोकरत्न पुरस्कार




**बीड । सत्यवादी**

समाजातील वंचित, दुर्बल व पीडित घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देत विधी विभागात तसेच सामाजिक क्षेत्रात प्रभावी व प्रेरणादायी कार्य करणारे ॲड. शेख जावेद बशीर मनियार यांना पोलिस हक्क संघर्ष संघटना तर्फे मानाचा 'सावित्रीबाई फुले लोकरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

विधी क्षेत्रात कार्यरत असताना ॲड. मनियार यांनी सामान्य नागरिकांना मोफत कायदेविषयक सल्ला, पोलिसी कायदेशीर मदत, मानवाधिकार संरक्षण, तसेच न्यायालयीन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. कायदा हा केवळ ग्रंथापुरता मर्यादित न राहता तो समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, या भूमिकेतून त्यांनी अनेक प्रकरणांमध्ये पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी ठामपणे लढा दिला आहे.

सामाजिक क्षेत्रात त्यांनी शिक्षण, जनजागृती, समता, संविधानिक मूल्ये, सामाजिक सलोखा आणि मानवतेचे भान जपणाऱ्या उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला आहे. विविध सामाजिक कार्यक्रमांमधून कायदेविषयक साक्षरता वाढवणे, युवकांमध्ये संविधानाची जाणीव निर्माण करणे, तसेच अन्यायाविरुद्ध संघटित व वैचारिक लढ्याची दिशा देणे, हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य ठरले आहे.

ॲड शेख जावेद बशीर मनियार यांच्या या कार्याची दखल घेऊन शाह अल्पसंख्याक बहु उद्देशीये सेवाभावी संस्था संचालित पोलिस हक्क संघर्ष समिती तर्फे सावित्रीबाई फुले लोकरत्न पुरस्कार प्रदान देण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष शेख जेबा (बाजी) डॉ मुजाहेद मोमिन (अतिरिक जिल्हा शालेय चिकित्सक बीड) खान सबीहा मॅडम (सचिव अंजुमन इशाअत तालीम बीड) डॉ शकील खान, अब्दुल कादीर शाह व इतर मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# शेतकरी अपघातग्रस्तांसाठी वैद्यकीय सहाय्य निधी नियमांत शिथिलतेची आ.धसांची मागणी



**आष्टी । सत्यवादी**

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांची मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख डॉ. चैतन्य कागदे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत मतदारसंघातील गंभीर आजारग्रस्त रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळण्याबाबत तसेच निधीसाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रियेमधील अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

ग्रामीण भागातील शेतकरी शेतीची कामे करत असताना ट्रॅक्टर, मळणी यंत्र, रोटावेटर, कडबा कुट्टी मशीन, ट्रॅक्टर ट्रॉली व इतर शेतीयुक्त अवजारे वापरताना होणाऱ्या अपघातांमध्ये गंभीर जखमी होत आहेत. मात्र अशा अपघातांनंतर उपचारासाठी सध्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळत नसल्याची गंभीर बाब आमदार धस यांनी निदर्शनास आणून दिली. यामुळे अनेक शेतकरी कुटुंबांवर आर्थिक संकट ओढावत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी वैद्यकीय सहायता निधीच्या नियमांमध्ये आवश्यक ती शिथिलता देण्याची गरज असल्याचे मत यावेळी मांडण्यात आले. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाशी थेट संवाद साधून, शेतकऱ्यांना अपघातानंतर तातडीची व प्रभावी वैद्यकीय मदत मिळण्यासाठी धोरणात्मक बदल करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. शेतकरी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी हा विषय प्राधान्याने मार्गी लावण्याचा ठाम निर्धार आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.

# द ग्रेट हजरत टीपू सुल्तान युवा मंचच्या बीड़ जिल्हा उपाध्यक्षपदी सय्यद जावेद अतार



**बीड । सत्यवादी**

प्रतिनिधी द ग्रेट हजरत टीपू सुल्तान युवा मंचच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी सय्यद जावेद अतार यांची नियुक्ती करण्यात आली असून, यानिमित्ताने संघटनेच्या नवीन शाखेचे उद्घाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष इम्रान इनामदार भैय्या यांच्या हस्ते सय्यद जावेद यांना नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला एमआयएम जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक भाऊ, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आरेफ खान, नगरसेवक सैय्यद इलियास,नगर सेवक अयूब खान,लियाकत बेग,आणि (समाजसेवक) शेख नेहाल अहेमद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.''युवा मंचच्या माध्यमातून सामाजिक कार्याला गती देऊन हजरत टीपू सुल्तान यांचे विचार घराघरात पोहोचवू,'' असा निर्धार यावेळी नवनियुक्त उपाध्यक्ष सय्यद जावेद अतार यांनी व्यक्त केला. त्यांच्या या निवडीबद्दल जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यावेळी, सैय्यद लालू भाई, इम्रान अतार, एमआयएम बांधकाम शहर अध्यक्ष सय्यद बासेद भाई, शेख मैनू भाई, शाहेद अतार, शेख तुराब, शेख अनिस, शेख रईस भाई, एजाज तंबोली, शेख हबीब भाई, शेख अब्बास भाई, इम्रान पठाण, समीर मामू यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्‌घाटन

**आष्टी । सत्यवादी**

सोमवार दि. ५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०:३० वा. रुई नालकोल येथे भगवान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अजय दादा धोंडे (अधिसभा सदस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर) हे उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना त्यांनी शिस्तीशिवाय यश मिळत नाही असे सांगून विद्यार्थ्यांनी शिस्त, परिश्रम, व सातत्याचा जोरावर जीवनात यश मिळवावे असे प्रतिपादन केले. तसेच जिल्हा समन्वयक डॉ. रवी सातभाई यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व समजावून सांगत समाजसेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास साधण्याचे आव्हान केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाघ डी.टी. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील पाच वर्षे गाव दत्तक घेण्याचे आश्वासन दिले.

# पै.सतीश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ७२ रक्तदात्यांनी केले रक्तदान!

**पाटोदा । सत्यवादी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला तर नेत्यांनीही यामध्ये रक्तदान करून कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले.

रक्तदान करून चालणार नाही ते गरजू पर्यंत पोहोचले पाहिजे आणि त्यासाठी हे रक्तदान आयोजित केले होते खऱ्या गरजूवंतांना रक्त योग्य वेळी मिळून त्यांचा जीव वाचला पाहिजे या हेतून दरवर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित केला जातो याही वर्षी श्याम भाऊ माने मित्रपरिवार आष्टी तालुक्याच्या वतीने हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला तर सतीश आबा शिंदे यांनी देखील कार्यकर्त्यांसोबत या रक्तदान शिबिरात सहभाग घेतला स्वतः रक्तदान केले आणि रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे सांगून इतरांनाही वर्षातून एकदा तरी रक्तदान करा असे आव्हान केले. या शिबिरासाठी बीड जिल्हा राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, अण्णासाहेब चौधरी, शिवाजीआबा डोके, उपमहाराष्ट्र केसरी अक्षय शिंदे, सुनील दादा नाथ, विजय अण्णा गाढवे, असलम शेख, महादेव डोके, शिवाजी शेकडे, सरपंच बाळासाहेब गर्जे, राहुल काकडे, भाऊ घुले, रिजवान शेख, पत्रकार सचिन पवार, दिगंबर पोकळे, अर्जुन आबा पवार, सुग्रीव पवार, सागर खेंगट, बाळासाहेब मोरे, इरफान शेख, देवा मुटकुळे, जालिंदर नाना गायकवाड, रमेश दादा भोगाडे, योगेश मुटकुळे, अमोल दरेकर, हनुमंत झगडे, बंडू पवार, अमोल थेटे, विठ्ठल चखाले, शाम माने, प्रवीण श्रीखंडे, शितू मुटकुळे, अनिल तावरे, गहीनाथ गाडे, चंदू सपकाळ, पंडित पोकळे, संतोष गोयकर, आबासाहेब तांबे, अशोक आवारे, शरद वाळेकर, सदाभाऊ बन, माहादेव घुले, बाबू शिंदे, निखिल नरोडे, कुमार धनवडे, अंगदबीचे विकी हंबर्डे यांच्यासह सर्व नेते मंडळी सहकार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



## रक्तदान श्रेष्ठ दान-पै.सतीश शिंदे

वाढदिवसानिमित्त दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित केला जातो यामधून अनेक गरजूवंतांना योग्य वेळी रक्त मिळाल्याने त्यांचा जीवही वाचला आहे. रक्तदान हे अत्यंत महत्त्वाचे असून हे सर्वश्रेष्ठ दान असल्याने दरवर्षी हा उपक्रम घेतात त्याबद्दल सर्व माझ्या मित्र परिवाराचे खूप खूप आभार भविष्यातही या ठिकाणी गरज भासेल त्या ठिकाणी रक्त भेटेल यासाठी सर्व टीम प्रयत्नशील असेल.

**– पै.सतीश आबा शिंदे**, जिल्हा परिषद सदस्य

C M Y K

दैनिक आपल्या लोकांचा **सत्यवादी**

बुधवार 07 जानेवारी 2026 Page 4

# अल्पवयीन टग्यांची मुख्य रस्त्यांवरून रॅश ड्रायव्हिंग!

# जि.प. शिक्षण विभागात डिमोशनचा मोठा घोळ!

**बीड । सत्यवादी**

बीड जिल्हा परिषद शिक्षण विभागात सध्या बदल्या आणि पदस्थापनेवरून मोठे वादंग निर्माण झाले आहे. पदवीधर शिक्षक पदावरून स्वेच्छेने पदावनती (डिमोशन) घेऊन सहशिक्षकाच्या जागा लाटण्याचा नवा प्रकार समोर आला असून, यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणाने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




(पान २ वर...)

## प्रशासकीय कारवाई होणार का?

या सर्व प्रकारामुळे जिल्हा परिषदेच्या प्रतिमेला तडा जात असून, प्रामाणिक काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून, यामध्ये सहभागी असलेल्या दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## आर्थिक व्यवहाराची चर्चा

शिक्षण विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हा प्रकार सुरू असल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या वर्तुळात आहे. ''सोयीची जागा'' पदरात पाडून घेण्यासाठी लाखो रुपयांचे आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पदवीधर शिक्षकांनी अशा प्रकारे डिमोशन घेऊन कनिष्ठ पदावरील सहशिक्षकांच्या जागा अडवल्यामुळे, पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या पात्र सहशिक्षकांवर मोठा अन्याय होत आहे.

## कर्णकर्कश आवाजात गाडी चालवणाऱ्या पोरांना पोलीसांनी धडा शिकवावा



### एसपींच्या आदेशाची पायमल्ली

**बीड । सत्यवादी**

शहरातील मुख्य रस्त्यांवर अल्पवयीन दुचाकीस्वारांनी धुमाकूळ असून शहरातील सुभाष रोड धोंडीपुरा, कारंजा रोड, जुना बाजार, तेलगाव नाका, गांधीनगर, बलभीम चौक या ठिकाणी अल्पवयीन दुचाकी स्वाराने धुमाकूळ घातला असून वाहतुकीचे कसलेच नियम माहिती नसलेल्या अशा दुचाकी स्वरामुळे अपघाताची संख्या वाढण्याची शक्यता आहे. दोनच दिवसापूर्वी बीड जिल्ह्याचे एसपी यांनी अल्पवयीन मुलांनी जर गाडी चालवली तर त्यांच्या पालकांना २५ हजार रुपये दंडाची शिक्षा जाहीर केली परंतु त्यांच्या आदेशाला कसल्याच प्रकारे बीड करांनी जुमानले नसल्याचे दिसून येत आहे यामुळे कायदा आणि संस्थेचे प्रश्न निर्माण झाला आहे. बीड शहरात अल्पवयीन मुलांची दुचाकी चालवण्याची सवय मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शाळा, कॉलेज आणि इतर शिक्षण संस्थांच्या समोर कर्णकर्कश आवाजात दुचाकी चालवणाऱ्या मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतुकीच्या नियमांची पायमल्ली होत आहे, तसेच अपघातांच्या संख्येची शक्यता देखील वाढत आहे.

त्यानुसार, बीडचे एसपी यांनी अल्पवयीन मुलांना दुचाकी चालवण्यासाठी कडक आदेश दिले आहेत. ''जर कोणत्याही अल्पवयीन मुलाने दुचाकी चालवली, तर त्याच्या पालकांना २५,००० रुपये दंड ठोठवला जाईल,'' असे त्यांनी स्पष्ट केले आहे. ही घोषणा केल्यानंतर, अनेकांनी या आदेशाची गंभीरतेने दखल घेतली असली, तरी काही लोकांनी अजूनही या आदेशाचे उल्लंघन सुरू ठेवले आहे.

शहरातील सुभाष रोड, धोंडीपुरा, कारंजा रोड, जुना बाजार, तेलगाव नाका आणि गांधीनगर या प्रमुख ठिकाणी अल्पवयीन मुलांनी सर्रासपणे दुचाकी चालवताना दिसले. हे दृश्य आणि ध्वनी प्रदूषण नागरिकांच्या लक्षात आले असून, त्यामध्ये काही दुचाकीस्वारांच्या वेगवान गाडी चालवण्याने मोठय दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## नाळवंडीच्या उर्वरित रस्त्याचा प्रश्न मार्गी लावू–आ.विजयसिंह पंडित

### नाळवंडी नाक्यावर ६३ लाख रुपये किंमतीच्या रस्ता कामाचे उदघाटन




**बीड । सत्यवादी**

आ.विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले आहे. सदर काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करण्यात येत असून उर्वरित नाळवंडी रस्त्याच्या कामाचा प्रश्न देखील राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून मार्गी लावू अशी ग्वाही यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित यांनी दिली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी नाळवंडी नाक्याच्या पुढे ते उड्डान पुलापर्यंत रस्ता

(पान २ वर...)

## साहेबांचं नेतृत्व मान्य–अजित पवार

**पुणे । सत्यवादी**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सध्या राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. या महानगरपालिका निवडणुकीच्य निमित्ताने अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी असे दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी आघाडी केली आहे. आगामी काळात दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण होणार का? असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित होतो आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पिंपरीत बोलत



असताना मोठं वक्तव्य केलं आहे.

मी यशाने हुरळून जाणारा आणि पराभवाने खचून जाणारा

(पान २ वर...)

### आम्ही सत्तेचा माज येऊ दिला नाही!

२५ वर्षांची आमची कारकिर्द पाहा आणि यांची गेल्या ८ ते ९ वर्षांच्या कारकीर्द पाहा असे अजित पवार म्हणाले. आमच्याकडे सत्ता होती तरी आम्ही सत्तेचा माज येऊ दिला नाही. सत्तेची मस्ती कधी येऊ आम्ही दिली नाही असे अजित पवार म्हणाले अनेक समाजाला आण्ही प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. आपल्याला पिंपरी चिंचवड शहराला देशातील पहिल्या क्रमांकावर घेऊन जायचं आहे. त्यासाठी माझ्या विचारांची माणसे विजयी करा असं अजित पवार यावेळी म्हणाले.

## जातीय द्वेषातून रा.प. अधिकाऱ्याकडून छळ

**बीड । सत्यवादी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बीड आगारात कार्यरत असलेले वाहतूक निरीक्षक भिमकिरण विनायक बनसोडे यांनी वरिष्ठ अधिकारी निलेश पवार यांच्यावर जातीय भावनेतून मानसिक, प्रशासकीय व वैयक्तिक छळ केल्याचा गंभीर तक्रार करत रा .प.प्रशासनाकडुन न्याय देण्यात यावा मागणी केली आहे. मागासवर्गीय समाजातील असल्यामुळेच आपल्यावर अन्याय केला जात असल्याचा थेट तक्रार त्यांनी केली आहे.

बनसोडे हे मागील दोन वर्षांपासून बीड आगारात प्रामाणिकपणे सेवा बजावत असताना, सन २०२२–२३ या कालावधीत तत्कालीन आगार व्यवस्थापक निलेश पवार यांनी जाणीवपूर्वक खराब सी.आर. लिहून बढती रोखण्याचा प्रयत्न

(पान २ वर...)


## इंस्टॉलमेंटच्या नावावर व्याजाचे अवैध धंदे सुरु

**बीड । सत्यवादी**


बीड शहर व ग्रामीण भागात इंस्टॉलमेंट/हप्त्याच्या नावावर व्याजाचा धंदा मोठ्या प्रमाणात फोफावत असल्याचे चित्र आहे. गरजू नागरिकांची आर्थिक अडचण हेरून काही खासगी सावकार व एजंटांकडून बेकायदेशीरपणे कर्ज दिले जात असून, ठराविक कालावधीत परतफेडच्या नावावर जादा व्याज वसूल केले जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

रोजंदारी वर काम करणारे गोरगरीब नागरिकांना इंस्टॉलमेंट/हप्त्याच्या नावावर कोरा धनादेश व आधारकार्ड प्रत घेऊन काही रक्कम देऊन हफ्ते बांधून घेतले जात असून एक हजार रुपयावर ३००/४०० रुपये व्याज घेऊन ठराविक काळात परतफेड करणे बंधनकारक केले जात आहे. जर एखादा हफ्ता थकला तर त्यावर फाईनच्या नावावर जादा रक्कम वसूल केली जात आहे.

या व्यवहारात अनेक ठिकाणी कोणतेही अधिकृत कागदपत्र, करारनामा किंवा पावती न देता व्यवहार केले जात असल्याने कर्जदारांची मोठी आर्थिक पिळवणूक होत आहे. हप्ते थकले की धमकी, मानसिक त्रास, सार्वजनिक बदनामीसारख्या प्रकारांनाही नागरिक सामोरे जात आदळून येत आहेत. परिणामी सामान्य नागरिक कर्जाच्या विळख्यात अडकत असून कुटुंबीयांवरही त्याचा गंभीर परिणाम होत आहे. पोलिस प्रशासनाने इंस्टॉलमेंट/हप्त्याचा धंदा करणाऱ्यांची तात्काळ तपासणी करून त्यांचे लायसेन्स, नोंदणी व व्यवहारांची वैधता तपासावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलिस प्रशासन नियमबाह्य व्याजदर आकारणाऱ्यांवर कठोर कारवाई करून अवैध कर्जव्यवहारांना आळा घालतील, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.




## आष्टी तालुका पत्रकार संघाची कार्यकारणी जाहीर




**आष्टी । सत्यवादी**

आष्टी तालुका पत्रकार संघाची सर्वसाधारण बैठक आज दर्पण दिनी उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडली. या बैठकीत संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली.

या बैठकीत अध्यक्षपदी संतोष सानप, उपाध्यक्षपदी मनोज पोकळे व शरद रेडेकर, सचिवपदी विनोद ढोबळे, तर कार्याध्यक्षपदी भीमराव गुरव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

(पान २ वर...)

## बीडमध्ये महिला उद्योजकतेचा महाकुंभ!

**बीड । सत्यवादी**

बीडच्या उद्योग क्षेत्रात महिलांनी आता आपली ताकद दाखवून दिली आहे. तेजस्विनी ग्रुपच्या संचालिका सोनल अरविंदसिंह पाटील यांच्या कल्पकतेतून आयोजित महिला उद्योजकांच्या भव्य प्रदर्शनाने यशाचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. रामकृष्ण लॉन्स येथे पार पडलेल्या या प्रदर्शनात केवळ गर्दीच झाली नाही, तर लाखोंची उलाढाल होऊन महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा नवा पायंडा रचला गेला.

या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे केवळ स्थानिकच नव्हे, तर पुणे, अकोला, लातूर, संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहरांतून आलेल्या महिला उद्योजिका! प्रदर्शनात एकूण ७० ते ८० स्टॉल्स लावण्यात आले होते. यामध्ये हाताने बनवलेली तोरणे, दागिने, मसाले, मकर संक्रांती विशेष वाण, साड्या ,कपडे, साडी ज्वेलरी, गृह सजावटी चे सामान, ऑरगॅनिक

(पान २ वर...)



## गुत्तेदार आणि प्रशासनाचा भोंगळ कारभार!

### नगर रोड परिसरातील रहीवासी धुळीने त्रस्त

**बीड । सत्यवादी**

नगर रोड बालेपीर करपरा नदीवरील पुलापासून ते ग्रामसेवक कॉलनी पर्यंत परिसरातील महामार्गाची अर्धवट काम सोडून गुत्तेदार पसार झाला. जवळपास अर्धा किलोमिटर परिसरातील ग्रामसेवक कॉलनी पर्यंतचे रहिवासी नागरिक प्रचंड धुळीने त्रस्त आहेत. या भागतील रहिवास्यांच्या त्रासाकडे लक्ष द्यायला महामार्ग प्रशासनासाठी वेळ नाही. शुध्द हवेचा नागरिकांचा मुलभूत अधिकार पायदळी तुडविला जात आहे. म्हणून या भागातील अर्धवट राहिलेले महामार्गाचे काम तात्काळ पूर्ण करून नागरिकांचा प्रचंड धुळीमुळे होणारा त्रास थांबवावा अशी मागणी होत आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की बीड–नगर महामार्गाचे काम २०२५ मध्ये अत्यंत संथ गतीने करण्यात आले शहरातील बालेपीर भागातील करपरा नदीवरील पुलाच्या अलीकडून मुंडे हॉस्पिटल पासून ते भगवान नगर पर्यंत एका बाजुचे काम झाले नाही. त्या साधारण अर्धा कि.मी.रस्त्यावरून वाहतून सुरू आहे. कच्चा रस्ता असल्याने वाहनांची प्रचंड धूळ उडते व ती परिसरातील पोलिस पेट्रोल पंप, इंद्रगस्थ कॉलनी, काझी नगर, बालेपीर मस्जीदीच्या पाठीमाच्या चार पाच कॉलनीत, तसेच भगवान नगर, पंडित नगर ते ग्रामसेवक कॉलनी पर्यंत ती धूळ प्रत्येकाच्या घरात घुसुन भांडे–कुंडे–कपडे घराची फरशी इतकेच नव्हे अगदी खाण्यापिण्याच्या स्वंयपाकावरही धूळ बसते त्यामुळे मोठ्या प्रमाणावर महिला वैतागलेल्या, त्रस्त झालेल्या आहेत. हजारो मुला–बाळांच्या,वृध्दांच्या सर्वांच्याच नाका–तोंडात डोळयात ही धूळ जावून स्वसनाचे डोळ्याचे आजार उद्भू लागले आहेत.

स्वच्छ आणि शुध्द हवेच्या नागरिकांच्या अधिकारीची गुत्तेदार आणि महामार्ग प्रशासना कडून पायमल्ला होत आहे. बीडचे जिल्हाधिकारी अत्यंत कर्तव्य कठोर असल्याचे बोलले जाते

(पान २ वर...)

## मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दर्पण दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

देशातील पहिले मराठी दैनिक दर्पण ६ जानेवारी रोजी सुरू केले. या निमित्ताने सर्व मराठी पत्रकार दरवर्षी दर्पण दिन साजरा करतात. मराठी पत्रकार परिषद बीड शाखेच्या वतीने दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयात दर्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बीड शहरांमध्ये मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दर्पण दिन साजरा करण्यात आला .या निमित्ताने

(पान २ वर...)

This newspaper is published by **Shaikh Rehan Shaikh Feroz** from H.No.3-1-292, Imampur Road, Dhole Wasti, Beed, Maharashtra - 431122 on behalf of Shaikh Rehan Shaikh Feroz, edited by Shaikh Rehan Shaikh Feroz and printed by Abdul Raheman Yusuf Shaikh at Nirmitee Prints, Old Bhaji Market, House No.2-1-54, In Front of Bank of Badoda, Subhash Road, Beed, Maharashtra - 431122.
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com**

हे पत्र मालक, प्रकाशक शेख रेहान शेख फेरोज यांनी निर्मिती प्रिंट्स, जुनी भाजी मार्केट, घर क्र.२–१–५४, बँक ऑफ बडोदा समोर, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड महाराष्ट्र – ४३११२२ येथे छापून दैनिक आपल्या लोकांचा सत्यवादी कार्यालय इमामपुर रोड, बीड येथे प्रसिद्ध केले.
Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com ✲ संपादक : शेख रेहान शेख फेरोज